(१)

SNDT WOMEN'S UNIVERSITY
1, Nathibhai Thackersey Road, Mumbai-400020.
Special Cell
Inward No. ARama.
Date 20/11/2023
File No.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल. vishi१-hted@mah.gov.in
दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- संकीर्ण-२३०२/प्र.क्र.२८/विशि-१
दिनांक:-२० नोव्हेंबर,२०२३

प्रति,
कुलसचिव,
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,
मुंबई.

**विषय**:- शिक्षकीय संवर्गाच्या बिंदूनामावलीस मान्यता देण्याबाबत.
**संदर्भ**:- १) आपले पत्र क्र.आस्था-१/सामान्य-०३/२०२३-२४/१५२०, दि.२२.०९.२०२३
२) आपले पत्र क्र.आस्था-१/सामान्य-०३/२०२३-२४/१५२६, दि.०४.१०.२०२३

संदर्भाधीन पत्रान्वये श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई येथील शिक्षकीय संवर्गाच्या बिंदूनामावलीस तसेच एकूण ८६ पदांच्या आरक्षण निश्चितीस अंतिम मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. त्यानुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

२. सामान्य प्रशासन विभाग (१६-ब) यांनी खालील मुद्दे उपस्थित करुन विद्यापीठातील शिक्षकीय संवर्गातील पदांच्या बिंदूनामावलीस तसेच आरक्षण निश्चितीस अंतिम मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर मुद्यांसंदर्भात स्पष्ट खुलासा तात्काळ सादर करावा.

१. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या बिंदू क्र.१ येथे दर्शविण्यात आलेल्या डॉ.शितल मोरे (अजा) (सहयोगी प्राध्यापक) यांची सदर बिंदूवरील नोंद रद्द करुन बिंदू क्र.६० (अराखीव) वर घेण्यात आली आहे. असे करताना कर्मचाऱ्याचा स्वत:चा जात प्रवर्ग या रकान्यामध्ये डॉ.मोरे यांचा जात प्रवर्ग "खुला" असा नमूद केला आहे. तरी,डॉ.मोरे यांचा जात प्रवर्ग बदलून लिहण्याचा स्पष्ट खुलासा सादर करावा.

२. अधिव्याख्याता/ग्रंथपाल संवर्गाच्या बिंदूनामावलीच्या शेवटी खाडाखोड करुन अजा प्रवर्गाचे १ पद (श्रीमती संगिता राणा (ठाकरे)) अतिरिक्त भरल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरी, सदर पद अतिरिक्त भरण्याची कारणे नमूद करुन त्याचा खुलासा सादर करावा. तसेच, बिंदूनामावलीमध्ये खाडाखोड होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. सहायक प्राध्यापक/सहायक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/सहायक ग्रंथपाल/प्रकल्प अधिकारी संवर्गाच्या बिंदूनामावलीमध्ये बिंदू क्र.४८ (अराखीव) येथे कार्यरत उमेदवार श्रीमती अनिता सानु यांचा

सेवानिवृत्ती दिनांक २०.०२.२०२४ असा नमूद केला आहे. तरी श्रीमती सानु यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकाबाबत खात्री करुन त्यानुसार बिंदूनामावलीमध्ये आवश्यक बदल करावा.

४. शासन निर्णय दि.२४.०७.२०२३ अन्वये एस.व्ही.टी.कॉलेज ऑफ होमसायन्स,मुंबई येथील पदभरतीस मान्यता असलेल्या ०८ सहायक प्राध्यापक पदांचा प्रस्तावित आकृतीबंध वित्त विभागाकडून तसाच मंजूर करण्यात येईल या धारणेच्या अधिन राहून आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे.

५. भविष्यात तपासणीसाठी बिंदूनामावली सादर करताना माहे, ऑगस्ट अखेरची सादर करणे आवश्यक राहील.

सोबत.:-

३) सामान्य प्रशासन विभाग (१६-ब) यांच्या दि.०७.११.२०२३ च्या टिप्पणीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

४) एकूण ०२ मुळ बिंदूनामावली पुस्तिका.

(सं.रा.उतेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (विशि-१)

# बिंदुनामावली तपासणीबाबतचे प्रमाणपत्र

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई येथील प्राध्यापक, प्राचार्य, सहायोगी प्राध्यापक, उप-ग्रंथपाल, सहायक संचालक (आजीवन अध्ययन विभाग), सहायक प्राध्यापक, प्रकल्प अधिकारी (आजीवन अध्ययन विभाग), सहायक ग्रंथपाल, सहायक संचालक (शारीरिक शिक्षण) या संवर्गातील ७८ पदे आणि सर विठ्ठलदास ठाकरसी कॉलेज ऑफ होमसायन्स, मुंबई येथील सहायक प्राध्यापक या संवर्गातील ८ पदे असे एकूण ८६ शिक्षकीय पदांच्या सरळसेवा कोट्यातील दि.३०/०६/२०२३ रोजी अखेरची स्थिती दर्शविणाऱ्या बिंदूनामावल्यांची मा.सचिव (साविस) यांनी दिलेल्या मान्यतेनुसार प्रमाणित करण्यात येत आहेत.

(डॉ. सुजाता शिंदे)
कक्ष अधिकारी, सा.प्र.वि., १६-ब

दिनांक : २०.११.२०२३

**कक्ष अधिकारी**
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

सामान्य प्रशासन विभाग/१६-ब(ब)

अनौ.सं.क्र.२०९/२०२३

पूर्व पृष्ठावरील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या टिप्पणीस अनुसरुन सादर.

२. उपरोक्त टिप्पणीन्वये विभागाने श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचे आकृतीबंधातील प्राचार्य, प्राध्यापक, संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र (वेतनश्रेणी- AL-१४), प्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, सहायक संचालक, आजीवन अध्ययन वविस्तार, विभागप्रमुख, उप-ग्रंथपाल(वेतनश्रेणी- AL-१३A), सहायक प्राध्यापक, सहायक संचालक, शारिरीक शिक्षण, महाविद्यालय ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, प्रकल्प अधिकारी, आजीवन अध्ययन व विस्तार, सहायक प्राध्यापक, आजीवन अध्ययन व विस्तार (वेतनश्रेणी-AL-१०)या संवर्गातील ७८ पदे व एस.व्ही.टी.कॉलेज ऑफ होमसायन्स, मुंबई या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक(वेतनश्रेणी-AL-१०) या संवर्गातील ८ पदे अशीएकूण ८६ (७८+८=८६) शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदांची दि.३०.०६.२०२३अखेरची स्थिती असलेल्या बिंदूनामावल्यांची सहायक आयुक्त (मावक), कोकण यांनी प्राथमिक तपासणी केली असून अंतिम तपासणी व आरक्षण निश्चिती करुन देण्याची या विभागास विनंती केली आहे.

३. येथे असे नमूद करण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.७.०८.२०१९ व दि.१६.११.२०२२ अन्वये १५ अकृषि विद्यापीठे आणि शासन मान्य अभिमत विद्यापिठांसाठी मंजूर असलेल्या शिक्षक व शिक्षक समकक्ष एकूण पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दि.२४.०७.२०२३ अन्वये एस.व्ही.टी.कॉलेज ऑफ होमसायन्स, मुंबई या महाविद्यालयातील ८ रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.०१.०८.२०१९ व दि.०२.१२.२०२१ मधील तरतूदींनुसार बिंदूनामावलीचा कालावधी हा ऑगस्ट अखेरचा असणे अपेक्षित आहे. परंतु, सदर बिंदूनामावल्यांतील गोषवाऱ्यामध्ये कालावधी दि.३०.०६.२०२३ असा नमुद केलेला दिसून येत आहे. तरी याबाबत विद्यापीठास असे सुचित करण्यात येते की, भविष्यात सरळसेवेच्या बिंदूनामावल्या तपासणीसाठी पाठविताना माहे ऑगस्ट अखेरच्या सादर करणे आवश्यक राहील.

५. या विभागाच्या दि.०६.०७.२०२१ च्या शासन निर्णयानुसार विहित केल्याप्रमाणे परिच्छेद क्र. २ येथे नमूद संवर्गांच्या सरळसेवेच्या बिंदूनामावल्या तपासण्यात येत आहेत.

६. **१) सरळसेवा बिंदुनामावली: प्राचार्य/प्राध्यापक/संचालक**

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | प्राचार्य/प्राध्यापक/संचालक (वेतनश्रेणी- AL-१४) |
| २ | एकूण मंजुर पदे | २९ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | २९ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजूर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०३.२०१९ (पृ. ५२३-५२८ /प.वि.) |
| ७ | मंजूर पदांचा आकृति बंध | दि.२७.०५.२००९(पृ.२३/प.वि.)<br>दि.१३.०१.२०२३ (पृ.६०४/प.वि.)<br>दि.०१.०४.२००४ (पृ.४७ /प.वि.)<br>सहसंचालक, पुणे यांचे पत्र दि.०१.१०.२०११ (पृ.४३ /प.वि.)<br>दि.२७.०५.२००९ (पृ.२३/प.वि.)<br>दि.१३.०१.२०२३ (पृ.६०४/प.वि.)<br>दि.२७.०५.२००९ (पृ.२३/प.वि.)<br>दि.०१.०७.२०१७ (पृ.३९/प.वि.) |

दि.३०.०६.२०२३ अखेरची स्थिती पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ४ | २ | १ | १ | १ | १ (आळीपाळीने) | | ५ | १४ | २९ |
| २ | भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | ५ |
| ३ | रिक्त पदे | ४ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | ९ | २४ |

प्राचार्य/प्राध्यापक/संचालक या संवर्गात २९ मंजूर पदांचे आरक्षण ४ पदे अजा कायमस्वरुपी, २ पदे अज कायमस्वरुपी, १ पद विजा(अ) कायमस्वरुपी, १ पद भज(क) कायमस्वरुपी, १ पद भज(ब) कायमस्वरुपी, १ पद भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, ५ पदे इमाव कायमस्वरुपी, ३ पदे आदुघ कायमस्वरुपी व अराखीव-११ असे राहील. सदर संवर्गात अराखीव-५अशी एकूण५ पदे कार्यरत आहेत. सदर संवर्गात अजा-४, अज-२, विजाअ-१, भजब-१, भजक-१, भजड-१,इमाव-५ व अराखीव-९ याप्रमाणे २४ पदे रिक्त आहेत.

टीप:- भविष्यात तपासणीसाठी बिंदूनामावली सादर करतांना विभागाने माहे ऑगस्ट अखेरची सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटीच्या अधीन राहून, प्राचार्य/प्राध्यापक/संचालक या संवर्गाची सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

**७. आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-**

| अ.क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ४ | २ | १ | १ | १ | १ (आळीपाळीने) | | ५ | १४ | २९ |
| २ | भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | ५ |
| ३ | रिक्त पदे | ४ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | ९ | २४ |
| ४ | दि.३०/०८/२०२४ पर्यंतची संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ५ | एकूण रिक्त पदे | ४ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | १० | २५ |
| ६ | विभागाने भरतीसाठी मागणी केलेली पदे (पृ.१९-२७/टि.वि.) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १० |
| ७ | मागणीपत्रासाठीची पदे | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | ४ | १० |

टिप:- प्राचार्य/प्राध्यापक/संचालक या संवर्गाची बिंदूनामावली तपासली असता दि.३०/०९/२०२३ रोजी सदर संवर्गात बिं.क्र.६ येथील अराखीव प्रवर्गाची सेवानिवृत्तीमुळे १ पदांची संभाव्य रिक्तता उपलब्ध होत आहे.

८. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ व दि.१६.११.२०२२ नुसार अकृषि व अभिमत विद्यापीठांसाठी मंजूर असलेल्या एकूण पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी एकूण ७८ शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदे भरण्यास मान्यता आहे. त्यानुसार विद्यापिठाने दि.०४.१०.२०२३ (पृ.७३७/प.वि.) च्या पत्रान्वये ७८ शिक्षकीय पदांपैकी प्राचार्य/प्राध्यापक/संचालक(ॲकॅडमिक लेव्हल-१४) या संवर्गासाठी १० पदांची मागणी केली असल्याने प्राचार्य/प्राध्यापक/संचालक या संवर्गात मागणीपत्रासाठी अजा-२, अज-१, विजाअ-१, इमाव-२ व अराखीव-४ अशी पदे उपलब्ध होतील.

९. या विभागाने दि.१८.०३.२०२० च्या प्रमाणपत्रान्वये (पृ.९३-१५४/प.वि.) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठातील प्राचार्य/प्राध्यापक/संचालकया शिक्षकीय संवर्गाची बिंदूनामावली तपासून आरक्षण निश्चिती करुन देण्यात आली होती. परंतु, सन २०२० नंतर केवळ प्राचार्य संवर्गाचे एक पद अराखीव प्रवर्गातून भरले आहे. या व्यतिरिक्त कोणत्याही संवर्गात कोणतेही पद भरलेले नसल्याचे विद्यापीठाने दि.०१/११/२०२३ च्या पत्रान्वये (पृ. ८०५/प.वि.) कळविले आहे. सबब, आता सदर संवर्गाचे

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता भरती वर्ष-१ ठरेल.

१०. येथे असे नमूद करण्यात येते की, प्राचार्य/प्राध्यापक/संचालक या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदे ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहे.

प्रथम भरती वर्षात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:-

| एकूण भरावयाची पदे | आदुघ करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| १० | १.० पुर्णांकात १ पद |

त्यानुसार भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चिती खालीलप्रमाणे करुन देण्यात येत आहे.

| तपशील | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू आरक्षणाची पदे | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ | ३ | १० |

प्राचार्य/प्राध्यापक/संचालक या संवर्गातील १० रिक्त पदांचे आरक्षण अजा-२, अज-१, विजाअ-१, इमाव-२, आदुघ-१ व खुला-३ असे राहील.

११. **२) सरळसेवा बिंदुनामावली: प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभागप्रमुख/उप ग्रंथपाल**

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल (वेनतश्रेणी- AL-१३A) |
| २ | एकूण मंजुर पदे | ७२ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | ७२ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदूनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजूर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०३.२०१९ (पृ. ५२३-५२८ /प.वि.) |
| ७ | मंजूर पदांचा आकृति बंध | दि.२७.०५.२००९ (पृ.२३/प.वि.)<br>सहसंचालक, मुंबई यांचे पत्र दि.०३.०४.२००८ (पृ.५७/प.वि.)<br>सहसंचालक, मुंबई यांचे पत्र दि.३१.०३.२००८ (पृ.६१-/प.वि.)<br>दि.१३.०१.२०२३ (पृ.६०४/प.वि.)<br>दि.०१.०४.२००४ (पृ.४८/प.वि.) |

दि.३०.०६.२०२३ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ९ | ५ | २ | २ | ३ | १ | १ | १४ | ३५ | ७२ |
| २ | भरलेली पदे | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २१ | २७ |
| ३ | रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | ३ | १ | १ | १४ | १४ | ४५ |

प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/ उप ग्रंथपाल या संवर्गात ७२ मंजूर पदांचे आरक्षण अजा-९, अज-५, विजाअ-२, भजब-२, भजक-३, भजड-१, विमाप्र-१, इमाव-१४ व अराखीव-३५ असे राहील. सदर संवर्गात अजा-५, अज-१, व अराखीव-२१ अशी एकूण २७ पदे कार्यरत आहेत. सदर संवर्गात अजा-४, अज-४, विजाअ-२, भजब-२, भजक-३,भजड-१, विमाप्र-१,इमाव-१४ व अराखीव -१४याप्रमाणे ४५ पदे रिक्त आहेत.

टीप:- १. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या बिंदू क्र.१ येथे दर्शविण्यात आलेल्या डॉ.शितल मोरे (अजा) यांची सदर बिंदूवरील नोंद रद्द करुन बिंदू क्र.६० (अराखीव) वर घेण्यात आली आहे. असे करतांना कर्मचाऱ्याचा स्वत:चा जात प्रवर्ग या रकान्यामध्ये डॉ. मोरे यांचा जात प्रवर्ग "खुला" असा नमूद केला आहे. तरी, डॉ. मोरे यांचा जात प्रवर्ग बदलून लिहिण्याबाबत विभागाने स्पष्ट खुलासा

सादर करणे आवश्यक राहील.

२. भविष्यात तपासणीसाठी बिंदूनामावली सादर करतांना विभागाने माहे ऑगस्ट अखेरची सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटींच्या अधीन राहून, प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गाची सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

१२. **आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-**

| क्र | तपशील | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षणाचे प्रमाण /टक्केवारी | १३ | ७ | ३ | २.५ | ३.५ | २ | २ | १९ | ४८ | १०० |
| १ | मंजूर पदे | ९ | ५ | २ | २ | ३ | १ | १ | १४ | ३५ | ७२ |
| २ | भरलेली पदे | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २१ | २७ |
| ३ | रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | ३ | १ | १ | १४ | १४ | ४५ |
| ४ | दि.३०/०८/२०२४ पर्यंतची संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ५ | एकूण रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | ३ | १ | १ | १४ | १५ | ४६ |
| ६ | विभागाने भरतीसाठी मागणी केलेली पदे (पृ.१९-२७ /टि.वि.) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २३ |
| ७ | मागणीपत्रासाठीची पदे | २ | २ | १ | १ | १ | ० | १ | ७ | ८ | २३ |

टिप:- प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप-ग्रंथपाल या संवर्गाची बिंदूनामावली तपासली असता, सदर संवर्गात दि.३०.११.२०२३ रोजी बिं.क्र.४८ येथील अराखीव या प्रवर्गाची सेवानिवृत्तीमुळे १ पदांची संभाव्य रिक्तता उपलब्ध होत आहे.

१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ व दि.१६.११.२०२२ नुसार अकृषि व अभिमत विद्यापीठांसाठी मंजूर असलेल्या एकूण पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी एकूण ७८ शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदे भरण्यास मान्यता आहे. त्यानुसार विद्यापिठानेदि.०४.१०.२०२३ (पृ. ७३७/प.वि.) च्या पत्रान्वये ७८ शिक्षकीय पदांपैकी विभागाने प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/ उप-ग्रंथपाल (ॲकॅडमिक लेव्हल-१३ (ए))या संवर्गासाठी २३ पदांची मागणी केली असल्याने प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/ उप-ग्रंथपाल या संवर्गात मागणीपत्रासाठी अजा-२, अज-२, विजाअ-१, भजब-१, भजक-१, विमाप्र-१, इमाव-७ व अराखीव-८ अशी पदे उपलब्ध होतील.

१४. या विभागाने दि.१८.०३.२०२० च्या प्रमाणपत्रान्वये (पृ.९३-१५४/प.वि.) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठातील प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/ उप-ग्रंथपाल या शिक्षकीय संवर्गाची बिंदूनामावली तपासून आरक्षण निश्चिती करुन देण्यात आली होती. परंतु, सन २०२० नंतर केवळ प्राचार्य संवर्गाचे १ पद अराखीव प्रवर्गातून भरले आहे. या व्यतिरिक्त कोणत्याही संवर्गात कोणतेही पद भरलेले नसल्याचे विद्यापीठाने दि.०१/११/२०२३ च्या पत्रान्वये (पृ. ८०५/प.वि.) कळविले आहे. सबब,आता सदर संवर्गाचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता भरती वर्ष-१ ठरेल.

१५. येथे असे नमूद करण्यात येते की, प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/ उप-ग्रंथपाल या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदे ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहे.

प्रथम भरती वर्षात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:-

| एकूण भरावयाची पदे | आदुघ करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| २३ | २.३ पुर्णांकात २ पदे |

त्यानुसार भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चिती खालीलप्रमाणे करुन देण्यात येत आहे.

| तपशील | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू आरक्षणाची पदे | २ | २ | १ | १ | १ | ० | १ | ७ | २ | ६ | २३ |

प्राचार्य/सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप-ग्रंथपाल या संवर्गातील २३ रिक्त पदांचे आरक्षण अजा-२, अज-२, विजाअ-१, भजब-१, भजक-१, विमाप्र-१, इमाव-७, आदुघ-२ व अराखीव-६ असे राहील.

१६. **३) सरळसेवा बिंदुनामावली:अधिव्याख्याता/ ग्रंथपाल**
**या पदाची दि.३०.०६.२०२३ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे:-**

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | अधिव्याख्याता/ ग्रंथपाल (वेतनश्रेणी- AL-९A) |
| २ | एकूण मंजुर पदे | ४५ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | ४५ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०३.२०१९ (पृ. ५२३-५२८ /प.वि.) |
| ७ | मंजुर पदांचा आकृति बंध | दि.०१.०४.२००४ (पृ.४८/प.वि.) |

दि.३०.०६.२०२३ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ६ | ३ | १ | १ | २ | १ | १ | ८ | २२ | ४५ |
| २ | भरलेली पदे | ६ | २ | ० | ० | १ | ० | ० | २ | १४ | २५ |
| ३ | रिक्त पदे | ० | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ८ | २० |

अधिव्याख्याता/ ग्रंथपाल या संवर्गात ४५ मंजूर पदांचे आरक्षण अजा-६, अज-३, विजाअ-१, भजब-१, भजक-१, भजड-१, विमाप्र-१, इमाव-८ व अराखीव-२२ असे राहील. सदर संवर्गात अजा-६, अज-२, भजक-१, इमाव-२ व अराखीव-१४ अशी एकूण २५ पदे कार्यरत आहेत. तर, अज-१, विजाअ-१, भजब-१, भजक-१,भजड-१, विमाप्र-१, इमाव-६ व अराखीव-८ याप्रमाणे २० पदे रिक्त आहेत.

टीप:- बिंदूनामावलीच्या शेवटी खाडोखोड करुन अजा प्रवर्गाचे १ पद (श्रीमती संगिता राणा (ठाकरे)) अतिरिक्त भरल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरी, सदर पद अतिरिक्त भरण्याची कारणे नमूद करून विभागाने खुलासा सादर करावा. तसेच, बिंदूनामावलीमध्ये खाडाखोड होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी.

तसेच, भविष्यात तपासणीसाठी बिंदूनामावली सादर करतांना विभागाने माहे ऑगस्ट अखेरची सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटींच्या अधीन राहून, अधिव्याख्याता/ ग्रंथपाल या संवर्गाची सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

१७. ४) सरळसेवा बिंदुनामावली: सहायक प्राध्यापक/सहायक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/ सहायक ग्रंथपाल/प्रकल्प अधिकारी

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | सहायक प्राध्यापक/ सहायक संचालक/ महाविद्यालय ग्रंथपाल/ सहायक ग्रंथपाल/ प्रकल्प अधिकारी (वेतनश्रेणी-AL-१०) |
| २ | एकूण मंजुर पदे | २५८ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोट्यातील पदे | २५८ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदूनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजूर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०३.२०१९ (पृ. ५२३-५२८ /प.वि.) |
| ७ | मंजूर पदांचा आकृति बंध | दि.२७.०५.२००९ (पृ.२३/प.वि.)<br>दि.०८.०९.२०२० (पृ.४१/प.वि.)<br>सहसंचालक, मुंबई यांचे पत्र दि.०३.०४.२००८ (पृ.५७/प.वि.)<br>सहसंचालक, पुणे यांचे पत्र दि.०१.१०.२०११ (पृ. ४३/प.वि.)<br>दि.१३.०१.२०२३ (पृ.६०४/प.वि.)<br>सहसंचालक, मुंबई यांचे पत्र दि.३१.०३.२००८(पृ. ६१/प.वि.) |

दि.३०.०६.२०२३ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३४ | १८ | ८ | ६ | ९ | ५ | ५ | ४९ | १२४ | २५८ |
| १ | मंजूर पदे | ३४ | ५ | ३ | ० | १ | ३ | ० | १२ | ७० | १२८ |
| २ | भरलेली पदे | ० | १३ | ५ | ६ | ८ | २ | ५ | ३७ | ५४ | १३० |
| ३ | रिक्त पदे | | | | | | | | | | |

सहायक प्राध्यापक/ सहायक संचालक/ महाविद्यालय ग्रंथपाल/ सहायक ग्रंथपाल/ प्रकल्प अधिकारी या संवर्गात २५८ मंजूर पदांचे आरक्षण अजा-३४, अज-१८, विजा अ-८, भजब-६, भजक-९, भजड-५, विमाप्र-५, इमाव-४९ व अराखीव-१२४ असे राहील. सदर संवर्गात अजा-३४, अज-५, विजाअ-३, भजक-१, भजड-३, इमाव-१२ व अराखीव-७० अशी एकूण १२८ पदे कार्यरत आहेत. तर, अज-१३, विजाअ-५, भजब-६, भजक-८, भजड-२, विमाप्र-५, इमाव-३७ व अराखीव-५४ अशी १३० पदे रिक्त आहेत.

टीप:- विभागाने बिंदूनामावलीमध्ये बिंदू क्र. ४८ (अराखीव) येथे कार्यरत उमेदवार श्रीमती अनिता सानु यांचा सेवानिवृत्ती दिनांक २०/०२/२०२४ असा नमूद केला आहे. तरी, विभागाने श्रीमती सानु यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकाबाबत खात्री करून त्यानुसार बिंदूनामावलीमध्ये बदल करणे आवश्यक राहील.

तसेच, भविष्यात तपासणीसाठी बिंदूनामावली सादर करतांना विभागाने माहे ऑगस्ट अखेरची सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटींच्या अधीन राहून, सहायक प्राध्यापक/ सहायक संचालक/ महाविद्यालय ग्रंथपाल/ सहायक ग्रंथपाल/ प्रकल्प अधिकारी या संवर्गाची सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली वरीलप्रमाणे प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

१८. **आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-**

| अक्र | तपशील | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षणाचे प्रमाण /टक्केवारी | १३ | ७ | ३ | २.५ | ३.५ | २ | २ | १९ | ४८ | १०० |
| १ | मंजूर पदे | ३४ | १८ | ८ | ६ | ९ | ५ | ५ | ४९ | १२४ | २५८ |
| २ | भरलेली पदे | ३४ | ५ | ३ | ० | १ | ३ | ० | १२ | ७० | १२८ |
| ३ | रिक्त पदे | ० | १३ | ५ | ६ | ८ | २ | ५ | ३७ | ५४ | १३० |
| ४ | दि.३०/०८/२०२४ पर्यंतची | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ६ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संभाव्य रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ५ | एकूण रिक्त पदे (३+४) | १ | १४ | ५ | ६ | ८ | २ | ५ | ३८ | ५७ | १३६ |
| ६ | विभागाने भरतीसाठी मागणी केलेली पदे (पृ.१९-२७/टि.वि.) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५३ (४५+८) |
| ७ | मागणीपत्रासाठीची पदे | ० | ६ | २ | २ | ३ | १ | २ | १५ | २२ | ५३ |

***टिप**:- सहायक प्राध्यापक, सहायक संचालक, महाविद्यालय ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, प्रकल्प अधिकारी या संवर्गाची बिंदूनामावली तपासली असता, सदर संवर्गात दि.३१.०५.२०२४ रोजी बिं.क्र.२१ येथील अनुसूचित जाती प्रवर्गाची, दि.३१.०८.२०२३ रोजी बिंदु क्र.२ येथील अनुसूचित जमाती प्रवर्गाची, दि.३१.०३.२०२४ रोजी बिंदु क्र.४९ येथील इतर मागास वर्ग प्रवर्गाची, दि.३१.१०.२०२३, दि.२०.०२.२०२४, दि.३०.११.२०२३ रोजी अनुक्रमे बिंदु क्र.१०,४८ व ५० येथील अराखीव प्रवर्गाची सेवानिवृत्तीमुळे ६ पदांची संभाव्य रिक्तता उपलब्ध होत आहे.

सबब, सहायक प्राध्यापक/सहायक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/सहायक ग्रंथपाल/प्रकल्प अधिकारी या संवर्गातील एकूण ५३ रिक्त पदांचे आरक्षण अज-६, विजाअ-२, भजब-२, भजक-३, भजड-१, विमाप्र-२, इमाव-१५ व अराखीव-२२ असे राहील.

१९. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ व दि.१६.११.२०२२ नुसार अकृषि व अभिमत विद्यापीठांसाठी मंजूर असलेल्या एकूण पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी एकूण ७८ शिक्षकीय पदे भरण्यास मान्यता आहे. त्यानुसार विद्यापिठाने दि.०४.१०.२०२३ (पृ.७३७/प.वि.) च्या पत्रान्वये ७८ शिक्षकीय पदांपैकी सहायक प्राध्यापक/सहायक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/सहायक ग्रंथपाल/प्रकल्प अधिकारी (वेतनश्रेणी-AL-१०) या संवर्गासाठी ५३ (४५+८) पदांची आरक्षण निश्चिती व बिंदूनामावलीस अंतिम मान्यता देण्याची विनंती केली आहे.

***टीप**:- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दि.२४.०७.२०२३ च्या शासन निर्णयानुसार एस.व्ही.टी.कॉलेज ऑफ होमसायन्स, मुंबई या महाविद्यालयातील ८ रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार विद्यापिठाने दि.०४.१०.२०२३ (पृ.७३७/प.वि.) च्या पत्रान्वये एस.व्ही.टी.कॉलेज ऑफ होमसायन्स, मुंबई येथील सहायक प्राध्यापक या संवर्गाची अतिरीक्त ८ पदांची आरक्षण निश्चिती व बिंदुनामावलीस अंतिम मान्यता देण्याची विनंती केली आहे. **सदर ८ पदांचा प्रस्तावित आकृतीबंध वित्त विभागाकडून तसाच मंजूर करण्यात येईल या धारणेच्या अधिन राहून आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे.**

२०. या विभागाने दि.१८.०३.२०२०च्या प्रमाणपत्रान्वये(पृ.९३-१५४/प.वि.) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठातील सहायक प्राध्यापक/सहायक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/सहायक ग्रंथपाल/प्रकल्प अधिकारी या शिक्षकीय संवर्गाची बिंदूनामावली तपासून आरक्षण निश्चिती करुन देण्यात आली होती. परंतु, सन २०२० नंतर केवळ प्राचार्य संवर्गाचे १ पद अराखीव प्रवर्गातून भरले आहे. या व्यतिरिक्त कोणत्याही संवर्गात कोणतेही पद भरलेले नसल्याचे विद्यापीठाने दि.०१/११/२०२३ च्या पत्रान्वये (पृ. ८०५/प.वि.) कळविले आहे. सबब, आता सदर संवर्गाचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता भरती वर्ष-१ ठरेल.

२१. येथे असे नमूद करण्यात येते की, सहायक प्राध्यापक/सहायक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/सहायक ग्रंथपाल/प्रकल्प अधिकारी या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदे ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहे.

प्रथम भरती वर्षात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:-

| एकूण भरावयाची पदे | आदुघ करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| ५३ | ५.३ पुर्णांकात ५ पद |

त्यानुसार भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चिती खालीलप्रमाणे करुन देण्यात येत आहे.

| तपशील | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू आरक्षणाची पदे | ० | ६ | २ | २ | ३ | १ | २ | १५ | ५ | १७ | ५३ |

सहायक प्राध्यापक/सहायक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/सहायक ग्रंथपाल/प्रकल्प अधिकारी या संवर्गातील मागणीपत्रासाठी उपलब्ध ५३ रिक्त पदांचे आरक्षण अज-६, विजाअ-२, भजब-२, भजक-३, भजड-१, विमाप्र-२, इमाव-१५, आदुघ-५ व अराखीव-१७ असे राहील.

२२. उपरोक्त सहमती ही केवळ सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. समांतर आरक्षणाबाबत विभागाने आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. तसेच, मागणीपत्रात दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाच्या पदाची संख्या विहित आरक्षणानुसार आवश्यक संख्येइतकी आहे किंवा कसे ही बाब विभागाने आपल्या स्तरावरुन खातरजमा करणे आवश्यक आहे.

विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार बिंदुनामावली तपासण्यात आली असून बिंदूनामावल्यांमध्ये तक्रारी किंवा न्यायालयीन प्रकरण उध्दभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

२३. उपरोक्तप्रमाणे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठातील प्राध्यापक, प्राचार्य, सहायोगी प्राध्यापक, उप-ग्रंथपाल, सहायक संचालक, सहायक प्राध्यापक, प्रकल्प अधिकारी, सहायक ग्रंथपाल, सहायक संचालक शारीरिक शिक्षण या संवर्गातील ७८ पदे आणि एस.व्ही.टी.कॉलेज ऑफ होमसायन्स, जुहू, मुंबई येथील सहायक प्राध्यापक या संवर्गातील ८ पदे असे एकूण ८६ शिक्षकीय पदांच्या दि.३०.०६.२०२३अखेरची स्थिती असलेल्या सरळसेवा कोट्यांच्या बिंदूनामावल्यांच्या तपासणीस व आरक्षण निश्चितीस मान्यता देण्यास हरकत नसावी.

वरील अभिप्रायासह नस्ती उच्च व तंत्र शिक्षण विभागास परत पाठविण्यात यावी.

3.11.23

शिंदे 3.11.2023 — क.अ.(डॉ. शिंदे)

3/11/23 — अ.स.(श्री. आंधळे)

06/11/2023 — स.स.(श्री. अरब) — 15451/86 6/11/23

सचिव (साविस)(श्री.सुमंत भांगे)

प्र.स.(उ. व तं.शि.वि.)

16.11.23

11